APM/8173 MRS.KALPANA D.HALDAVNEKAR
APM/8140 MRS.SUNITA K.JADHAV
APM/8146 MR.NILAY I.JHALA
APM/8104 MRS.SHRADDHA S.JOSHI
APM/8101 MRS.GEETA KHAMKAR
APM/8091 MR.FAROKH J.KHODAIJI
APM/8194 DR.MANDA N.KUHITE
APM/8102 MRS.TANVI S.KULKARNI
APM/8103 MRS.SUNITA A.KULKARNI
APM/8166 MR.SUHAS R.KULKARNI
APM/8192 MRS.SATHI NARAYAN KUTTY
APM/8066 MRS.ANJALI JAYPRAKASH MASTAKAR
APM/8215 MRS.JASCINTHA J.MENDONCA
APM/8055 MRS.PRACHEE P. MOGRE
APM/8147 MRS.SUHAS A.MORDEKAR
APM/8137 MRS.ARUNA UMESH NAIK
APM/8131 MRS.V.D.OKA
APM/8106 MRS.SUMAN R.PANDE
APM/8144 MR.PRABHAKAR L.PATIL
APM/8216 MRS.KAMAL A.PATIL
APM/8098 MRS.VICTORIA PEREIRA
APM/8170 MRS.EVA J. PEREIRA
APM/8070 MR.VASANT G. PRABHU
APM/8167 MRS.ULKA K.RAUT
APM/8128 MRS.SUSHAMA A.REGE
APM/8143 MRS.OLINDA RODRIGUES
APM/8212 MR.L.P.ROHIRA
APM/8171 MT.ANUP SANKHE
APM/8099 MRS.MADHAVI R.SAWANT
APM/8132 MRS.SUPRIYA B.SAWANT
APM/8130 MRS.DAKSHA G.SHAH
APM/8214 MRS.SHANTA U.SONAWANE
APM/8141 MRS.UMA S.SURVE
APM/8193 MRS.ZARIN M.TANTRA
APM/8211 MRS.SUCHITRA U.TENDOLKAR
APM/8069 MR.AJIT B.THADANI
APM/8134 MRS.SHASHI R.VARSHNEY
APM/8127 MRS.BHARTI N.VIJAYKAR
APM/8090 MRS.REEBY ZACHARIA
APM/8135 MRS.SANJIVANI S.GAIKWAD
APM/8129 MRS.CHARULATA F.WAVAL
APM/8126 MRS.SUREKHA S.SHINGARE

**Nagpur**

APM/8123 MRS.USHA G.DARONDE
APM/8118 MRS.SUCHITRA S.JOSHI
APM/8124 MRS.PRATIBHA P.KATKAR
APM/8119 MRS.ASHWINI A.KULKARNI
APM/8116 MRS.CHHAYA S.MESHRAM
APM/8117 MRS.CHARUSHEELA A.LANDGE

**Nashik**

APM/8154 MR.YASHWANT G.BHAT
APM/8160 MRS.PRABHAVATI P.CHAUDHARI
APM/8197 MRS.SHOBHA A.DAWKHARE
APM/8072 MRS.MADHURI S.GOGATE
APM/8153 MRS.RAJSHREE J. MORE
APM/8053 MRS.NEELAM A.PASTEKAR
APM/8196 MRS.CHARUSHEELA J.TORNE
APM/8209 MRS.MADHURI ARUN WARUDKAR
APM/8200 MR.MADHAV D.GODBOLE
APM/8224 MRS.SUNITA S.HARAK
APM/8049 MRS.SUDHA S.KULKARNI
APM/8201 MR.PRAKASH D. SHIRDADE

**Pune**

APM/8223 MRS.SHOBHANA A.AHER
APM/8208 MRS.VIDYA LAXMAN ARANKE
APM/8081 MRS.SHAKUNTALA C.BAHIRAT
APM/8156. MRS.VAISHALI C.BHALWANKAR
APM/8158 MRS.ANJALI A.BHATE

APM/8184 MRS.MEENAKSHI BRAHMAKSHATRIYA
APM/8204 MR.BHUPENDRA K.CHAWDA
APM/8050 MRS.ARUNA A.CHIPLUNKAR
APM/8741 MR.SATEESH VIVEK DADHE
APM/8220 MRS.VAIJAYANTI MADHAV GADGIL
APM/8083 MRS.AGNES N.GAWARE
APM/8176 MR.DHANANJAY G.GHARAT
APM/8228 MRS.SHEELA A.GODBOLE
APM/8100 MRS.USHA V.GOKARN
APM/8221 MRS.SUNANDA ARVIND GOSAVI
APM/8227 MRS.VAISHALI V.INAMDAR
APM/8088 MRS.KAMAL S.JADHAV
APM.8188 MRS.PADMAJA JADHAV
ABM/8044 MRS.ASHA G. JOSHI
APM/8149 MR.SUDHEER M.JOSHI
APM/8110 MRS.ROHINI S.KAKADE
APM/8164 MRS.VIBHAVARI S.KORHALKAR
APM/8062 MRS,VASANTI SUDHAKAR KULKARNI
APM/8138 MRS.SHILPA SUHAS KULKARNI
APM/8157 MRS.CHITRALEKHA A.KULKARNI
APM/8054 MRS.ANJALI ASHOK NAIK
APM/8218 MR.ASHOK B.PARALIKAR
APM/8222 MRS.MADHAVI G.PARANJPE
APM/8032 MRS.SHOBHA R.SADAWARTE
APM/8111 MRS.SHUBHADA P. SARAF
APM/8205 MRS.NIRMALA ARUN SARODE
APM/8043 MR.SATWINDER SINGH
APM/8203 MRS.GEETA C. TAMBE
APM/8150 MRS.PRADNYA P.TARE
APM/8219 MRS.ALKA R.VANMORE
APM/8163 MRS.SHAILJA ASHOK VELHANKAR
APM/8231 MRS.DEEPA S.WAGH

### Ratnagiri

APM/8178 MRS.SUKHADA S.ATHALEKAR
APM/8179 MRS.SHITAL A.JOSHI
APM/8113 MRS.SMITA J.BHOSALE
APM/8182 MR.ARVIND KHANOLKAR
APM/8181 MRS.NAYANA B.NACHANKAR

### Sangli

APM/8152 MRS.SHEHANZBI A. ATTAR
APM/8046 MRS.PUSHPALATA B.KAMALAKAR
APM/8048 MRS.VIJAYA V.PATIL
APM/8047 MRS.NAJAMA S. SANADE
APM/8151 MRS.RAJANI G.PATIL
APM/8045 MRS.KAMAL S.SONAWANE

### Satara

APM/8042 MRS.PUSHPA YASHWANT KADAM

### Sindhudurg

APM/8191 MRS.RATNAPRABHA P.MIRASHI
APM/8067 MRS.ANURADHA G. KHANOLKAR

### Solapur

APM/8162 MRS.MONICA DIVAKAR
APM/8071 MRS.RATNAMALA A.GHODSE
APM/8189 MRS.ARCHANA S.HALLUR
APM/8190 MRS.ANJALI P.KOTHIMBIRE
APM/8086 MRS.MANJIRI S.MANGALWEDHEKAR
APM/8207 MRS.REHANA SAHEBLAL TAMBOLI

### Thane

APM/8059 MRS.MINAL MUKUND AMBEKAR
APM/8172 MRS.SANDHYA A.KHAIRNAR
APM/8063 MRS.SHAKUNTALA ARJUN LULLA
APM/8065 MRS.USHA VAMAN MANJREKAR
APM/8068 MRS.MADHU MEHROTRA
APM/8096 MR.MINAL P.PEDNEKAR
APM/8095 MRS.KRISHNA SINGH RAMMILAN
APM/8093 MRS.VAISHALI D.RANE
APM/8168 MR.ARVIND J.SHENDE
APM/8060 MRS.SUSHAMA Y. WANIWADEKAR

### Wardha

APM/8075 MRS.SUDHA M.GAWANDE

### Yavatmal

APM/8108 MRS.HINDMALA S.GANVIR
APM/8076 MRS.GIRJABAI G.MADAVI
APM/8109 MRS.BHAGYASHREE M.MULEY
APM/8107 MRS.APARNA K.PANDE

## Family Pensioner Members

### Amravati

FPBM/1000 SMT.MANGALA M.TAPPE

### Dombivali

FPPM/0997 SMT.SARITA R. AWAD

### Mumbai

FPPM/0998 SMT.VIMAL S.KARNIK

### Nagpur

FPBM/0995 SMT.VAISHALI S.AKOJWAR
FPBM/0996 SMT.SANJANA S.JUGADE.

### Pune

FPPM/0999 MR.ANIL JANARDAN DANI
FPBM/0993 SMT.VENU B.MANDHARE
FPPM/0992 SMT.JYOTI A.MEHTA
FPBM/0994 SMT.NEETA A.BONGANE

## List of Donors who gave Donations during Annual General Meeting dt.1-08-2008

| NAME | AMOUNT |
|---|---|
| SMT.SHUBHADA GADGIL | 6100 |
| MR.B.R.GADRE | 2000 |
| M/s NAVADIKAR MUSICALS | 1500 |
| MR.SHRINIWAS PADALIKAR | 1111 |
| MR.V.D.KULKARNI | 1111 |
| MR.M.M.AYACHIT | 1002 |
| MR.SUHAS BHALERAO | 1001 |
| MR.C.B.HINGORANI | 1001 |
| MR.V.H.GURJAR | 1000 |
| SMT.MUDHWA HIRALAXMI | 1000 |
| MR.V.G.PENDSE | 1000 |
| MR.V.R.PUNEKAR | 750 |
| MR.A.G.JOSHI | 501 |
| MR.G.B.PHATAK | 501 |
| SMT.SHALINI KASHIKAR | 501 |
| MR.VIKRAM R.PANDIT | 501 |
| MRS.ALKA P.JOSHI | 501 |
| MR.P.G.KAKODKAR | 501 |
| MR.S.D.DANDAVATE | 500 |
| MR.G.H.GURJAR | 500 |
| MR.A.M.JOSHI | 500 |
| MR.NARAYAN GUJAR | 500 |
| MR.DAYANAND SHASTRI | 500 |
| MR.B.A.DESAI | 500 |
| MR.ASHOK A.APTE | 500 |
| MR.M.K.DEO | 500 |
| MRS.R.S.KOTASTHANE | 500 |
| MR.PRAMOD Y.JOSHI | 500 |
| SMT.KAVERI C.KUVALEKAR | 500 |
| MR.M.G.SARAF | 500 |
| MR.V.K.HERLEKAR | 500 |
| MR.G.L.DEO | 500 |
| MR.A.M.SARAF | 251 |
| SMT.VANDANA S.KULKARNI | 251 |
| MR.V.L.KARANDIKAR | 250 |
| MR.V.G.KOTWAL | 250 |
| MR.ASHOK E.KASHIKAR | 201 |
| SMT.SHARAYU A.KULKARNI | 201 |
| MR.J.R.VIRJI | 201 |
| MR.ARUN RAJE | 200 |
| MR.VISHWAS M.BHAGWAT | 200 |
| MR.K.S.DHINGRA | 200 |
| MR.ARUN PATANKAR | 200 |
| MR.S.V.PAREKH | 151 |
| MR.D.N.MORE | 105 |
| MR.A.M.JADYAL | 105 |
| MR.P.R.GUPCHUP | 101 |
| MR.B.K.KIRTIKAR | 101 |
| MR.ASHOK BUTALA | 101 |
| MR.P.S.RAJE | 101 |
| MR.R.H.DASTANE | 101 |
| MR.J.D.BOGGA | 101 |
| MR.RAGHUNATH A.INAMDAR | 101 |
| MRS.MINAL Y.DABKE | 101 |
| MR.D.R.BENDRE | 101 |
| MR.S.A.MULAY | 101 |
| MR.A.P.NIMDEO | 101 |
| MR.W.A.KURHEKAR | 101 |
| MR.ANAND M.DESHPANDE | 100 |
| MRS.ANANDI A.DESHPANDE | 100 |
| MR.S.V.SAHASRABUDHE | 100 |
| MR.MAHADEO V.DESHPANDE | 100 |
| MR.D.A.KULKARNI | 100 |
| MR.S.S.SAHASRABUDHE | 100 |
| MR.V.G.MULAY | 100 |
| MR.V.M.BHALERAO | 100 |
| MR.A.D.KALE | 100 |
| MR.ASHOK WAKCHAURE | 100 |
| MR.RAMESH VAIDYA | 100 |
| MR.L.G.KULKARNI | 100 |
| MR.VILAS WADVEKAR | 100 |
| MR.S.W.KHAJURKAR | 100 |
| MR.P.P.DUNAKHE | 100 |
| MR.M.K.JOSHI | 100 |
| MR.V.N.SETH | 100 |
| SMT.MANGALA KHADILKAR | 100 |
| MR.ANIL KHADILKAR | 100 |
| MR.S.G.THORBOLE | 100 |
| MR.RAVIKANT V.PANDIT | 100 |
| MR.RAM KAMLAKAR | 100 |
| MR.B.S.SHINDE | 100 |
| MR.S.S.PATKI | 100 |
| **Total Rs. -** | **34,960** |

## 0 रविराज



आला हळुहळू वरती तो रविराज ।
वेगळेच तेज भासे आज ।।
प्रकाशली दिशा पूर्व ।
दैदीप्यमान शोभा अपूर्व ।।
सोनेरी किरणांनी दिपले गगन ।
उजळले तसेच मन ।।
आनंदले पक्षीगण ।
प्रफुल्लीत फुलं-पानं ।।
उजळूनी निघाल्या दिशा अन् पाऊलवाटा ।
जाहल्या सोन-केशरी सागर-लाटा ।।
फांद्यांमधूनी उतरले असे रविकिरण खाली ।
धरतीने जणु पिवळी शाल पांघरली ।।

**- सौ.मंगला वि.पुणतांबेकर,** पुणे

# 'संवाद' लेख स्पर्धा २००८

## पुरुष विभाग : तृतीय पारितोषिक विजेता लेख

# ''आयुष्यात मी काय कमावलं ? काय गमावलं ?'' शोध आणि बोध

काय कमावलं आणि काय गमावलं याचा लेखाजोखा मांडताना आज आठवतयं - बँकेत काम करत असताना 'श्रीमंत' करणारे किती छोटे छोटे कण वेचले होते आपण ! जमाराशी वृद्धीसाठी आणि ग्राहक सेवेसाठी चांदीची ट्रॉफी आपल्याला मिळाली तेव्हा किती श्रीमंत केलं होतं आपल्याला ! नंतर वैयक्तिक सेवा विभागात प्रमुख म्हणून काम करताना स्टेशन रोड सोलापूर शाखेत निवृत्ती वेतन धारकांसाठी मोफत वैद्यकीय चिकित्सा आणि विनामूल्य औषध वाटपासाठी एक मेळावा भरवला आणि निवृत्ती वेतन धारकांना त्यांच्या मनातलं सगळं बोलण्यासाठी, त्यांना बोलतं करण्यासाठी, निचरा होऊ देण्यासाठी बँकेचं व्यासपीठ देऊ केलं होतं. तेव्हा डोळ्यात अश्रू आणि हातात आपले हात घेऊन काही निवृत्ती वेतनधारक कृतज्ञ झाले - तो क्षण ! त्याक्षणीही असेच श्रीमंत झालो होतो आपण. सुशिक्षित बेकार योजनेखाली त्या तरुणाला वेळेवर कर्ज दिलं तेव्हा त्याच्या चेहऱ्यावरचं समाधान आणि काही वर्षांनी त्यानं ते व्यवस्थित फेडलं म्हणून आपल्याला झालेला आनंद - हे सगळे 'श्रीमंत' करणारे तर क्षण होते !

''हाती खूप पैसा आला म्हणून आपण काही सोन्याचा भात खात नाही. आपल्याला मिळालेला पैसा गरजूंना, आपल्या तुलनेत कमनशीबी असणाऱ्या गरीबांना मदत करण्यासाठी परमेश्वरानं आपल्याला दिलेला असतो. Compassion towards poor, downtroden is very important in the life.

Infosys Foundation च्या अध्यक्षा डॉ.सुधा मूर्ती हजारो बहुश्रुत सोलापूरकरांसमोर बोलत होत्या - टाळ्यांचा पाऊस पडत होता.

''जवळीक संस्थेचे शशीकांत लावणीस खूप चांगलं काम करताहेत. त्यांच्यामुळे मी आज सोलापूरात आले.'' असं सुधा मूर्ती म्हणत असताना आपण खूप श्रीमंत होत होतो.

१०० कोटीहून अधिक रूपये गरीबांच्या आरोग्यासाठी, शिक्षणासाठी खर्च करणाऱ्या पद्मश्री सुधा मूर्ती ! सहा विद्यापीठांकडून 'डॉक्टरेट' पदवीने सन्मानित झालेल्या, भारताचे भूषण सुधा मूर्ती ! त्यांच्या हस्ते सत्कार झाला आपला आणि खूप कमावलं आयुष्यात असंच वाटलं !

तरल दिग्दर्शक, संवेदनशील पटकथालेखक, प्रेमळ बाप 'गुलजार'. हिंदी चित्रपटसृष्टीतला एक 'बाप' माणूस त्यांच्या 'बोसकीयाना' बंगल्यातल्या वैयक्तिक भेटीनेही ही 'श्रीमंती' दुसऱ्यांदा अनुभवली आपण. 'गुलजार बोलतो त्याची कविता होते' ह्या कार्यक्रमाचे ५० हून अधिक प्रयोग कोल्हापूर-पुणे, सांगली-मुंबई इथे झाले. कार्यक्रमाची 'कॅसेट' निघाली तेव्हा कराची मधल्या माझ्या एका मित्राला देण्यासाठी तुमची आणखी एक कॅसेट मला हवी आहे' असा प्रत्यक्ष 'गुलजारांचा' फोन आला आणि आपण रोमांचित झालो. आपणच काय आपल्या घरचा फोनही 'श्रीमंत' झाला होता त्या दिवशी !

पु.ल.देशपांडे, गुलजार, सुधा मूर्ती यांच्या वैयक्तिक सहवासांनी खूप 'कमावलं' आयुष्यात. सोबतीला अरूणा ढेरे, राजन खान, शांता शेळके, चंद्रशेखर गोखले या साऱ्यांनी सुगंधच सुगंध दिला. त्यांच्या वैयक्तिक भेटींनी रूपये, आणे, पै-यांच्या व्यवहारी जगात वावरताना बँकेत काम करताना - कुटुंबातल्या जबाबदाऱ्या पार पाडत असताना त्या परमेश्वरानं हे दान पदरात पसा पसाभर टाकलं - हीच तर कमाई आपली ! खरी कमाई. आकड्यात न मोजता येणारी - टॅक्स भरायला अथवा चुकवायला न लावणारी - ही खरी श्रीमंती !

पण आयुष्यात काय कमावलं यापेक्षा काय गमावलं याची जंत्री करू म्हटलं तर यादी मोठी होईल. मग लक्षात येतं की आपण गाभूळलेली चिंच अनेक वर्षात खाल्ली नाही. जत्रेत मिळणारे आणि हवेत उंचच उंच जाणारे लाल-निळे फुगे आपण खूप वर्षांत उडवले नाहीत. रात्री चमकणारे काजवे पकडून खिशात टाकले नाहीत. दोन बोटं तोंडात अलगद आत घालून, आपल्याला आता शिट्टी वाजवता येत नाही. कापसाची म्हातारी पकडण्यात आपल्याला आता 'चार्म' वाटत नाही. ते साबणाचे फुगे, विटीदांडू, ते दोन दोन मुलांच्या रांगा करून जोड्या करून चालणं, २६ जानेवारी, १५ ऑगस्टला शाळेत मिळणाऱ्या त्या गोड रंगीबेरंगी गोळ्या, तो खाऊ आता तसलं काही नाही. बालपणीचा तो काळ सुखाचा पार क्षितिजापलिकडं गेलाय हे लक्षात आलं की मन उदास होतं.

१४ वर्षांचा असताना वडील गमावून बसलो. लहानपणी आपली इवली बोटं हातात धरून शाळेच्या मोठ्या इमारतीत सोडायला येणारे, आपल्या मित्रांबरोबर मित्र होऊन क्रिकेट खेळणारे, नवा घेऊन दिलेला फुटबॉल पहिल्याच दिवशी शाळेत हरवून आल्यावर आपलं कसनुसं अपराध्यासारखं झालेलं तोंड पाहून ''अरे, चालायचंच. वेडा ! आपण दुसरा बॉल आणू उद्या !'' असं म्हणणारे आणि पोराच्या चेहऱ्यावर 'हसू' परत आणणारे वडील गमावून झालेलं नुकसान पुढे आयुष्यात भरून निघालं नाही. ''भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे !'' असा दिलासा देणारे अक्कलकोटचे स्वामी समर्थ नंतर ! पण त्याही आधी 'वडील' हे तर पाहिलेले देव !

पुढे मग खूप वर्ष आईनं 'आई आणि वडील' या दोन नात्यातला फरक जाणवू दिलाच नाही.

''आई एक नाव असतं, घरातल्या घरात गजबजलेलं गाव असतं

आई असतो एक धागा, वातीला उजेड दाखवणारी समईतली जागा !''

पण ही जागाही गमावली आपण. आई गेल्यावर वडील गेल्याचं

दुसऱ्यांदा दुःख अनुभवलं. आईला आज्जी होण्याची उसंतही देवानं दिली नाही.

आणि अखेरीस 'तुलाही' गमावून बसलो मी. एक साथ असते रस्ते ओलांडताना - जिवलग आधाराची - ती हरवून बसलो मी ! आपल्या लग्नानंतर लगेचच बहिणीचं लग्न ठरल्यावर देण्याघेण्याचा प्रश्न ऐरणीवर आला. अंगावरची पुरती हळदही न उतरलेली 'तू' पुढे सरसावलीस. तुझ्या माहेराहून आणलेलं सारं 'स्त्री-धन' अंगावरून उतरवलंस आणि हसत म्हणालीस,

''हे काय ! ताई वन्संसाठी माझे हे सगळे दागिने आहेत ना - मग आता काळजी कशाची करताय ?'' केवढा अभिमान वाटला तेव्हा मला आणि माझ्या आईविना सगळ्या पोरक्या घराला 'आधार'. पुढे दिवस पालटले. अपार सुखं आली दाराशी पण मधुमेहानं अशीच अचानक नेलं तुला आमच्यातून.

हं ! काय कमावलं, काम गमावलं याचा ताळेबंद नकोच होता मांडायला. ह्या साऱ्यांना गमावून मांडलेल्या लेखाजोख्यात बाकी शून्यच येणार ना ?

''आभाळांसाठी पाखरू हवे
पाखरांसाठी झाड हवे
झाडासाठी अंगण हवे
अंगणासाठी घर हवे
घराला दोन डोळे हवेत''

'इंदीरा संतां'च्या या कवितेतले आई-वडील हे दोन डोळे ! ते गमावले अन् आता वाटतं - घर, अंगण, झाड, पाखरू हेही हळूहळू गमावून बसलो आपण.

पण गेलेली वर्ष, गेलेली माणसं परत येणार नाहीत. भविष्यातल्या वर्षांची शाश्वती नाही. अशा वेळी आपल्या हातात एकच उरतं -आजच्या दिवसाची Quality वाढवणं. आजच्या दिवसाला नटवणं, आनंद आणि हंसू उधळता येईल तेवढं उधळून देणं !

**- शशीकांत लावणीस,** सोलापूर

---

## 0 विनोद - कारण ☺

तंटामुक्त एका खेडेगावात सरपंचाच्या एकसष्टी निमित्त मोठी सत्कार सभा झाली. त्यांचे भाषणही चांगले झाले. गळ्यात भरपूर हार आले. सभेला सगळा गाव लोटला होता.

एक गावकरी - (ग्रामसेवकास )

कां हो ? एवढी मोठी सभा झाली, सरपंचांचे गळ्यात चांगले ५०/६० हार पडले. तरी सरपंचांच्या चेहऱ्यावर निराशा का ?

ग्रामसेवक - अहो ! त्यांनी एकूण ७५ हारांचे पैसे दिले होते. आता बोला !

**- प्रभाकर गुपचूप,** पुणे

---

# 'संवाद' लेख स्पर्धा २००८

### स्त्री विभाग : तृतीय पारितोषिक विजेता लेख

## ''आमच्या वेळी बाई, असं नव्हतं !''

फोनची रिंग वाजली. ''हॅलो, अहो आई, मी सोनाली. उठायला जरा उशीर झालाय. आम्ही तिकडेच येतोय ब्रेकफास्टला, येऊ ना? आणि पोळीभाजी झालीय ना, तुमची लवकर होते ना म्हणून म्हटलं. तीच नेईन मी डब्यात. मनिष ना, कंपनीत जेवणार आहेत. ठेवते. उशिर झालाय ना, ५ मिनिटात येतोच आम्ही !''

''कुणाचा गं फोन होता, सुनेचाच असणार हो तुझ्या ! मुळीसुद्धा धाक नाही हो तुझा, कसल्या सासवा ग तुम्ही हल्लीच्या, आमच्यावेळी नव्हते हो असे ! सासू म्हटली की वर तोंड करून बोलायची सोय नव्हती म्हटलं '' - इति माझ्या सासुबाई.

'आमच्यावेळी बाई असं नव्हतं' ची सुरूवात तर हेड ऑफिसमधूनच झाली. पण त्या म्हणाल्या ते थोडंसं खरंच होते. मी पण कितीतरी वर्षे त्यांना घाबरतच होते. त्यामुळे संवाद अर्थातच जेवढ्यास तेवढाच व्हायचा. हे अंतर आस्ते आस्तेच कमी झाले. पण माझ्या सुनेने त्यांच्या काळाप्रमाणे ते झटक्यात कमी करून टाकले आणि मलापण ते खूप भावले. ती माझ्यावर आईसारखाच हक्क गाजवते आणि मायापण लावते, मग कशाला हवा धाक नि भिती ?

एकदा माझी नात श्रिया वय वर्षे ६/७ तणतणतच आली. ''आजी बघ ना गं आई काही सांगतच नाही, म्हणे आजीला विचार.'' मी म्हणाले, ''बोल काय म्हणतेस ?'' ''अग आजी, आज ना God कृष्णाची स्टोरी सांगितली टिचरनी. आता तूच सांग, त्या कंसमामाने देवकी नि वसुदेव दोघांना एकत्र कशाला ठेवले ? आणि त्या जाहिरातीत दाखवतात ते नव्हतं का त्यांना माहीत ? ऐकून मलाच काय बोलावे, सुचेना. आजकाल टी. व्ही. आणि जाहिराती मुलांचे बालपण का हिरावून घेत आहेत ? 'आमच्यावेळी नव्हते हो असे !' मुले मुलांसारखीच वागायची/बोलायची.

माझ्या आत्याच्या लग्नात मी असेन ७/८ वर्षांची. लग्न ठरल्यावर सगळे तिची चेष्टामस्करी करायचे. मी उगाचच तिच्या मागे मागे. एकदा तिला काका म्हणे, ''काय ताईबाई, आता हनीमूनला जायचे ना, मजा आहे बुवा एका माणसाची.'' मला काही कळेना. कोल्हापूरला देवीला जायचे माहीत होते, आणखीसुद्धा पुष्कळ गावे माहीत होती पण हे नव्हते, हनीमून का काय ते ! 'काका सांग ना, आत्या कुठे जाणार आहे ?' काका हसत एका दिशेला, आत्या दुसऱ्या. मी धावतच स्वयंपाकघरात, समोर काकू. काकू, सांग ना, हनीमून कुठे आहे, तू गेली होतीस ?' 'अग्गोबाई, कार्टी बघा काय विचारतेय ?' म्हणून काकू आईकडे. मी आईकडे, ''आई, आई, तूच सांग, हनीमून कुठे आहे, तू तरी गेली होतीस

का ?'' आईने एकदा टिपिकल आईच्या मोठ्ठ्या डोळ्यांनी पाहिले. पाठोपाठ एक धपाटा आणि वर तोंडाचा पट्टा. ''परत असलं विचारशील तर बघ, एवढीशी चिमुरडी, नाक पुसायची अक्कल नाही. (आता त्याचा काय संबंध होता का इथे ?) सांगून ठेवते, असले भलते सलते विचारून मला मान खाली घालायला लावू नकोस, अगोचर नुसती ?'' एवढे रागवायला काय झालं कोण जाणे, माहीत नसेल तर तसं सांगावं, मी हिरमुसले. आमच्यावेळी बाई हे अस्सं होतं पहा, जरा कुठे ज्ञानात भर घालावी म्हटले तर मार खायची लक्षणं.

असंच एकदा श्रियाला घेऊन माझ्या आजोळी गेले होते. आजोळचे घर तसे छोटेसेच. पूर्वी कोठे सगळ्यांची घरे मोठी असायची? श्रिया हळूच म्हणते कशी, ''अग आजी, दोनच रूम, मग किचन, बेडरूम, गेस्ट रूम ?'' मनात म्हटले, आमच्यावेळी नव्हती ग असली चैन आणि प्रायव्हसी वगैरे. आणि जनात म्हटले, ''अगं सोन्या, इथेच तर माझे मामा, मावशा, आई लहानाच्या मोठ्या झाल्या, त्यांची शिक्षणं, लग्न, सणवार इथेच झाले. घर लहान असले म्हणून काय झालं, सर्वांना सामावून घेणारी मनं तर मोठी होती ना!''

समाजाच्या मानसिकतेचे प्रतिबिंब चित्रपटातून दिसत असते. आमच्या वेळी मोठ्या पडद्यावर नायक-नायिका चंद्राच्या साक्षीने हळुवार प्रेमाच्या आणा भाका भावपूर्ण आणि श्रवणीय अशा सुरांच्या साथीने घेत असत. आता मात्र दिवसाउजेडी भर रस्त्यावर पुढे मागे १०/१५ जण कवायत किंवा सर्कस केल्याच्या थाटात, तोकड्या कपड्यात, विचित्र आणि अशोभनीय अंगविक्षेप करत हे दोघे जेव्हा 'जब तक रहेगा समोसेमें आलू' म्हणत प्रेमाच्या हळव्या नि कोमल भावनेचा खेळखंडोबा कसा करून टाकतात ते पाहिल्यावर म्हणावेसे वाटतेच ना, की आमच्या वेळी नव्हते बाई असे !

काव्य, संगीत, नृत्य, अभिनय इ. ललित कलांचे महत्त्व आता सर्वांनाच मान्य झाले आहे. छोट्या पडद्यामुळे होतकरू कलावंतांना हक्काचे व्यासपीठ, प्रसिद्धी आणि आर्थिक पाठबळही मिळत आहे. आणि या सर्वांबरोबरच आणि त्यामुळेच घरचाही पाठिंबा त्यांना सहजच मिळतो आहे. आमच्यावेळी बाई असे नव्हते. जरा कुठे मोठ्याने गाणे म्हटले की थिल्लरपणा समजला जायचा.

आमच्यावेळी घराचा केंद्रबिंदु पुरुषच असायचा. मुलगी लहान असताना पिता, नंतर भाऊ/नवरा मग मुलगा तिच्यावर सत्ता गाजवायचे. तिच्या गुणांप्रमाणे नव्हे तर पतीच्याच मिळकतीप्रमाणे/प्रतिष्ठेप्रमाणे तिला घरात/समाजात मानसन्मान मिळत असे. मग मामलेदाराची बायको मामलेदारीण तर घरमालकाची मालकीणबाई वगैरे आणि दुर्दैवाने नवरा हयात नसेल तर त्याचे खापर तिच्याच डोईवर. आधीच सासुरवाशीण त्यात विधवा, सर्वांचे उणेदुणे बोल तिने सोसायचेच. पण सणवार, धार्मिक कार्याच्या वेळी तिला सहजच बाजूला केले जायचे. सौभाग्यालंकार तर अशक्यच, पण जे कुंकू ती लहानपणापासूनच लावायची, त्यावरही तिचा हक्क नसायचा. सांगायला संकोच आणि दु:खपण होते की विधवा स्त्रियांनी चोळी घालू नये असाही संकेत होता. आज मात्र मुलीच्या विवाहाचे वेळी पिता हयात नसेल तर आई देवक ठेवते, नव्हे मुलगी तसा आग्रह धरते, गुरूजी/समाज/सासरची मंडळी त्याला जेव्हा आनंदाने मान्यता देतात, तेव्हा अगदी समाधानाने म्हणावेसे वाटते, आमच्यावेळी नव्हते हो असे !

राज्य स्तरावर हुतुतू खेळायला ताईची निवड झाली होती. काका पाठवायला मुळीच तयार नव्हते. बाईपण घरी आल्या होत्या समजूत घालायला. पण नाहीच. त्याच माझ्या ताईने आम्ही लेकीला उच्चशिक्षणासाठी परदेशी पाठवले, म्हणून माझी पाठ थोपटली, तेव्हा तिने त्याकाळी थोपवलेले अश्रू मला आत्ताही तिच्या डोळ्यात अगदी स्वच्छ दिसले.

अजूनही सांगावे तेवढे थोडेच आहे. गेल्या २५/३० वर्षात भोवतालच्या परिस्थितीत झपाट्याने बदल झाला. समाजाचा मोठा भाग असलेला मध्यमवर्ग, ज्या वर्गावर संस्कार, परंपरा, नीतीमूल्ये, शिक्षण जोपासण्याची जबाबदारी असते, तो वर्ग एका नवश्रीमंत होण्याच्या प्रक्रियेतून जात आहे. अर्थातच कालच्या चैनीच्या गोष्टी आज गरजेच्या झाल्या आहेत. कालच्या कौतुकाच्या/सन्मानाच्या गोष्टी आज थट्टेच्या झाल्या आहेत. कालचा साधेपणा आज बावळटपणा ठरतो, नि:स्वार्थी मदत केली तर तो अव्यवहारीपणा ठरतो आणि आल्यागेल्याच्या घराला पूर्वी प्रतिष्ठा होती, आता पसारा म्हणतात.

बदलत्या काळाबरोबर मुली खूप शिकल्या आणि मिळवत्या झाल्या, एवढेच नाही तर सर्व क्षेत्रात वेगाने पुढे जाऊ लागल्या. पुरुषांची मक्तेदारी असलेली क्षेत्रेही त्यांनी आपलीशी केली. पूर्वी तिची मिळकत म्हणजे त्याची भाकरी तर तिचे मीठ एवढीच. पण आता ती त्याला क्वचित मागेही टाकू लागली. आणि इथेच सगळे बदलू लागले. त्याला, तिची कार्यक्षमता, कामाचा झपाटा, तारतम्य, निर्णय घेण्याची क्षमता, प्रतिकूल परिस्थितीतही चिवटपणे झुंज देण्याचा तिचा स्वभाव या सर्वांमुळे मानावेच लागेल. आता त्याच्याबरोबर तिचेही कामाचे तास वाढले. या सर्वांमुळे पूर्वी संसारात त्याचा सहभाग जो पूर्वी फक्त पैसे मिळवण्यापुरताच होता, तो वाढला. आता तो तिला मदत करू लागला. बाळाचे संगोपनही दोघे मिळून करू लागले. खऱ्या अर्थाने संसार दोघांचा झाला.

म्हणूनच आमच्यावेळी बाई असं नव्हतं असे जेव्हा कौतुकाने म्हणण्याची वेळ येते, तेव्हा अशी वेळ वारंवार येवो असेच म्हणावेसे वाटते, खरे ना !

**- सौ.उत्तरा श्रीनिवास सोमण**, पुणे.

# प्रथम वर्ष पुण्यस्मरण



## कै.सौ.मंदाकिनी राजाराम पंडित (जळगांव)

जन्म - १३ एप्रिल १९४८, स्वर्गवास - ९ सप्टेंबर २००७

***देह ऐसा झिजवावा, जैसा चंदन व्हावा ।***
***आयुष्य संपले तरी, सुगंध दरवळत रहावा ।।***
***मनी होते भोळेपण, कधी न दाखविले मोठेपण ।***
***चेहरा होता हसतमुख, सर्वांची होती अतिप्रिय***
***लाभेल का अशी पुन्हा दिव्यमूर्ति***
***पुनर्जन्म घ्या आमच्यासाठी व श्रेया, अथर्वसाठी***

* आपले शोकाकुल *

श्री.राजाराम मंगु पंडित (पती)

चि.गिरीषकुमार व सौ.नेहा पंडित (मुलगा व सून)
श्री.योगेश व सौ.संगिता महाजन (जावई व मुलगी)
श्री.नरेंद्र व सौ.चारुशिला पाटील (जावई व मुलगी)
श्री.संजय व सौ.ज्योति येवले (जावई व मुलगी)
चि.श्रेया, अथर्व पंडित (नातवंडे)
चि.बिट्टू, राज, सोनू, आदित्य (नातवंडे)

समस्त पंडित परिवार कोचूर, ता.रावेर,जि.जळगांव

# भाव तोची देव

जून २००७ चा शेवटचा आठवडा. माझ्या पाठीची शस्त्रक्रिया (Spinal Stenosis) होऊन एक वर्ष झाले नव्हते. तरी बायकोच्या आग्रहावरून मी कसाबसा LFC वर कुलू, मनाली, सिमला चा दौरा करायला तयार झालो. मुख्य म्हणजे हा दौरा संपल्यावर बसने परत येताना, यात्रिक ट्रॅव्हल्स ची संगत चंदीगढला सोडायची होती व कटराला जायचे होते.

आम्ही सकाळी १० वाजता जम्मू स्टेशनवर आलो. मुले कमवायला लागल्यामुळे फक्त सौभाग्यवती बरोबर होती. स्टेशनच्या बाहेर कटराला जाणाऱ्या बसेस होत्या आणि प्रवाशांची झुंबड. जम्मू-कटरा फक्त १ तासाचा प्रवास. दुपारी १२ च्या दरम्यान कटराला पोहोचलो. थेट एका साध्या हॉटेलात उतरलो. हॉटेल फक्त लगेज ठेवण्यासाठी वापरायचे होते.

थोडावेळ आराम करून एकच छोटीशी बॅग घेऊन आम्ही वैष्णोदेवीस निघालो.

सौं.चा आग्रह आपण कटरा-वैष्णोदेवी चालत जायचं. माझं मन तयार होईना कारण मी आयुष्यात कधीच एका दिवसांत (१३+१३) २६ किलोमीटर चाललो नव्हतो. ३४ वर्षे दुचाकीची सवय लागल्यामुळे मी फार तर २ किलोमीटर चालणारा माणूस.

कटराला जेवण घेऊन नंतर पुढे जायचा विचार. जेवण म्हणजे सगळीकडे फक्त राजमा-राईस. आम्ही जेवायला बसलो आणि जोराचा पाऊस सुरू झाला. आजूबाजूला चौकशी केली तर हा पाऊस अवेळी होता. सिझन सुरू व्हायला एक ते दीड महिना होता. आम्ही जेवून पाऊस थांबण्याची वाट पाहत बसलो. तास दीड तास झाला तरी पाऊस जाण्याची चिन्हे दिसत नव्हती. सौ.मला म्हणाली, ''तुम्ही एवढा देव देव करता, आता काहीतरी करा.'' मी वैष्णोदेवीच्या फोटोसमोर हात जोडून विनंती केली, ''माते, तू आम्हाला येथपर्यंत आणले ते नक्कीच दर्शन देण्यासाठी. आम्ही ह्या पावसात डोंगर चढू शकत नाही व इथून तुझे दर्शन घेतल्याशिवाय परत जाऊ शकत नाही, तरी कृपा करून हा पाऊस आवरता घे.'' आणि काय चमत्कार ! पाऊस जो थांबला तो आम्ही गोव्याला घरी येईपर्यंत बंद.

दुपारी ३ वाजता आम्ही चढायला सुरूवात केली. वाटेत दोन्ही बाजूला दुकाने होती. शीतपेयांची दुकाने जास्त. रस्ता सुरेख, स्वच्छ व सगळीकडे ट्यूबलाईटचा उजेड. तेरा किलोमीटरची वाट पण भाविक वैष्णोदवीचा जयजयकार करत 'जय मातादी, आगे बोलो जयमातादी, पीछे बोलो जय मातादी, जोरसे बोलो जय माता दी.'

आम्ही रमत गमत, थांबत व लिंबू सरबत घेत रात्री १० वाजता कमिटी ऑफिसात पोहोचलो, तिथे एक लॉकर घेऊन लगेज ठेवले व रांगेत उभे राहिलो. रांग बरीच लांबलचक होती व दर्शनाला ४ तास लागतील असं एका स्थानिक माणसाने सांगितले. आम्ही तर फारच दमलो होतो. कधी एकदा पाठ जमिनीला लागेल ह्याची वाट पाहत होतो. एकंदर रात्री २ पर्यंत रांगेत राहायची आम्ही मनाची तयारी केली. एक माणूस वरून खाली लोकांना बघत बघत येत होता, त्याच्याबरोबर दोन मुले होती. तो साधारण ३५ ते ४० वर्षाचा माणूस आमच्याकडे येऊन थांबला व विचारता झाला, 'आप कितने आदमी हो ?' मी म्हटले 'दो, मैं और मेरी पत्नी'. म्हणाला, 'आप दोनों लाईनसे बाहर निकलो. मेरे पास ५ लोगोंका VIP पास है । मेरे साथ दो बच्चे है, आपभी मेरे साथ आइए'। मी म्हटले, 'देवी पावली'. आम्ही रांग सोडून १५ मिनिटात देवीचे दर्शन घेतले. दर्शन फक्त ५ सेकंदांचे. तीन वेगवेगळ्या शिळा, त्याच्यावर वस्त्रे सजवलेली.

दर्शन घेतले व त्या माणसाला भेटायला वळलो. त्याने आपले नाव अहूजा असे सांगितले होते. तो सहरानपूरहून आला होता. अहूजा म्हणून हाक मारली तर त्याने दोन्ही मुलासहीत कुठे दडी मारली ती देवीच जाणे.

आम्ही काय समजायचे ते समजलो. त्या माणसाला शोधायच्या भानगडीत न पडता आम्ही ब्लँकेट घेऊन झोपलो ते सकाळी ६ वाजता उठलो व परतीची वाट धरली. कटराहून सरळ जम्मू व पुढे दिल्ली. परतीच्या प्रवासात आम्ही दोघेही विचार करीत होतो तो अहूजा कुठे अदृश्य झाला ?

अनेक अडथळे-अडचणी यांच्यावर यशस्वीपणे मात करून अखेर आम्हाला वैष्णोदेवीचे दर्शन घडले होते. मनाला अपूर्व समाधान लाभले होते. तृप्त मनाने आम्ही परतलो होतो. ह्या सुखद स्मृतीमुळे सौं. चा देवावरील विश्वास दृढ झाला.

– **प्रभाकर साळगांवकर,** राय, गोवा.

# 0 चारोळ्या

प्रवासात आमुच्या शेजारी
बालक किंवा वृद्धा असते
परंतु सुंदर तरुणी अथवा
मोहक ललना कधीच नसते !

कविता लिहिणे सोपे आहे
पण विकणे फार अवघड !
मैत्रिण मिळवणे तसे सोपे
पण टिकवणे फार अवघड !

दु:खाची इतकी सवय झाली
सुखाची ओळख पटत नाही
परक्यांची एवढी घसट झाली
आपल्यांची पारख होत नाही

(**सु.शं.देशमुख,** सातारा)

## 0 श्रावण श्रावण । गुळातुपाचा रावण

रसज्ञा, रसना, जिव्हा आपल्या जिभेला ही तीन नावे आहेत. या जिभेचे सामर्थ्य फार मोठे. जगामध्ये जगमित्र । जिव्हेपाशी आहे सूत्र ।। या जिभेमुळे साहित्यात नवरस तर भोजनात षड्स. साहित्यातील रस आपण तूर्तास बाजूला ठेवू. कारण सध्या चातुर्मास चालू आहे. आषाढी एकादशीला 'देवशयनी एकादशी' म्हणतात. श्रावण, भाद्रपद, आश्विन आणि कार्तिक या चातुर्मासातील हवामान, पर्यावरण ध्यानात घेऊन आहारावर आरोग्याच्या दृष्टीने, नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने कांदा, लसूण इ. वर्ज्य मानले आहेत. (अर्थात् ते पाळणारे फार थोडेच असतात) अव्वल मांसाहारी लोक तर कडकडीत श्रावण पाळतात. हे सारे खरे असले तरी आपले जिव्हालौल्य तितकेच विलक्षण. 'चवीने खाणार त्याला के प्र देणार' अशा जाहिराती आपण पहात असतोच. सुगरण गृहिणी तर आपले पाककौशल्य पणाला लावून विविध पदार्थ घरच्यांना (आणि बाहेरच्यांनाही) खाऊ घालून तृप्त करतात. तर अशा पदार्थांच्या कृति शिकवणारी अनेक पुस्तके उपलब्ध असतात. ही झाली अलिकडची गोष्ट. पण आहाराचे उल्लेख फार पुरातन आहेत. भगवद्गीतेमध्ये आहाराचे सात्विक राजस, तामस असे प्रकार सांगितले आहेत आणि ज्ञानेश्वरीत देखील त्याचे वर्णन आहे. पण परवा एकनाथी भागवत वाचताना २५ व्या अध्यायातील ओव्या वाचताना मी थक्क झालो. (खरेतर तोंडाला पाणी सुटले म्हणाना.) खाद्यपदार्थांची नावे त्यात नाहीत. पण किती प्रकाराने खाद्यपदार्थ बनवता येतात त्याची यादीच पहा. गोड खरपूस आंबट । तळीव घोळीव तिखट । चिरीव चोळीव तुरट । वळीव वळवट आलिले ।।३७२।। रसीं रसांतरी मिळणी । पन्ही कालवणी शिखरणी । कुडीकुडी निर्पूस झणाणी । आहारभरणी राजस ।।३७३।। नाना परींच्या आवडी । सडिवा सोळिवा परवडी । रसनासुखाची अतिगोडी । तो आहार निवडी राजस ।।३७४।।

म्हणजे चौरस आहाराचे महत्त्व आपल्याकडे पूर्वापार ठाऊक असल्याचा पुरावा. साधी 'जिभं' ती काय पण तो शब्द उलटा वाचला तरी नाकांत खमंग वास दरवळल्यासारखे होते. मग खास 'भजी वेदर' ची फर्माईश होणारच. हे सारे श्रावण महिन्यामुळे आठवले. 'श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे' ही बालकवींची कविताही. त्याबरोबर श्रीबापूरावजी केळकरांचा अभंग आठवला. त्याची सुरूवात तर 'श्रावण श्रावण । गुळातुपाचा रावण ।' अशी आहे. पुढे ते म्हणतात - ऐसे म्हणती जन लोक । वाटे तयांचे कौतुक ।। श्रावणात करणे श्रवण । हेची परमार्थ साधन । अखंड नामाचे साधन । साधनमास दासा खूण ।।

वाचक मित्रांनो, श्रावण काय, चातुर्मास काय - जिव्हेचे सोहळे खुशाल पुरवा, पण प्रकृति मात्र निश्चित सांभाळा आणि आपल्या रूचिनुसार श्रवण, पठण अवश्य करा एवढेच सांगणे आहे.

- **श्रीधर वि. सहस्रबुद्धे,** पुणे

Rajguru Travels
Advertisement

## 0 पुजारी

मी सौंदर्याचा आहे एक पुजारी
गोठून जातसे व्यथा मनाची सारी
तो निसर्ग हिरवा, निर्झर खळाळणारा
मी प्रसन्न चित्ते मजा लुटतसे न्यारी
गोजिरे सानुले बालक जेव्हा बघतो
तो निरागसपणा मना आवडे भारी
मी कथा-नाटके-काव्य यामधे रमतो
आश्चर्य वाटते पाहुनी शब्दभरारी
सुस्नात सुंदरी लचकत-मुरडत जाता
वाटे हृदयावर चालविल्यात कट्यारी !
भवसागरामध्ये दु:ख जरी भरलेले
मी सौख्य शोधितो वाटे मना उभारी !

- **सु. शं.सरदेशमुख,** सातारा.

Regd. under RNI No. MAHBIL05356/13/1/2008-TC & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO Pune under Postal Concession register No. L-2/RNP/PNW/M-144/2008-2010 Dated 28.05.2008
Licence to post without Prepayment No.: LWP-217 at Market Yard PSO, Pune 37on 25th of each Month

# प्रतिक्रिया

'संवाद' जुलै २००८ चा अंक वेळेवर मिळाला. या अंकातील संपादकीय उद्बोधक वाटते. वार्षिक सर्वसाधारण सभा म्हणाजे स्नेह-मेळावाच असतो हे त्यातील सांगणे महत्त्वाचे आहे. अंकाची छपाई स्पष्ट असते. अंकातील सदरे, कविता, इंग्लिश-मराठी लेख माहितीपूर्ण असतात. लेख स्पर्धा ०८ चे पुरुष व स्त्री विभागाचे विषय छान आहेत व बक्षिस पात्र लेखही वाचनीय आहेत.

"संवाद" चा दर्जा उत्तरोत्तर उत्तम राहील अशी शुभ अपेक्षा.

**- अरुण भट,** बदलापूर (पूर्व)

* * * * * * * * * * * *

I wold like to congratulate Shri.Krantisen R. Athawale, Editor for his thought provoking Editorial. It gives food for thought (very nourishing too) to all my colleagues a kind of tonic to transform us to the "STATE OF NAVATARUNNYA" from our ripe oldage !

**- R. S. Hemadi,** Pune

# अभिनंदनीय

आपल्या असोसिएशनचे एक सभासद श्री.दि.हे.बापट यांचा नातू चि.अमर याने सायन्स आलिंपियाड फाउंडेशन नवी दिल्ली या संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या 'इंटर नॅशनल मॅथेमॅटिक्स आलिंपियाड' स्पर्धेमध्ये अपूर्व यश मिळवून तो सुवर्णपदकाचा मानकरी ठरला. ही परीक्षा सायन्स, गणित आणि आय.टी.मधील गुणवत्तेसाठी इ. २ री ते १० वी साठी घेतली जात असून प्रत्येक शाळेतील वर्गातील प्रथम क्रमांकाला सुवर्णपदक दिले जाते. चि.अमरचे हे यश निश्चित्तच अभिनंदनीय आहे.

-----------------------------

नागपूर येथील आपले ज्येष्ठ सभासद श्री. यशवंतराव तथा बाबासाहेब औरंगाबादकर यांचा नातू व नागपूरातील प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ. मिलिंद औरंगाबादकर यांचा ज्येष्ठ पुत्र चि. गौरांग हा २००८ साली झालेल्या १० वीच्या परिक्षेत ९४% गुण मिळवून उत्तीर्ण झाला. याबद्दल त्याचे असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन.

**- सेक्रेटरी**

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही.

२) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी.

संपर्क दूरध्वनी क्र (०२०) २४३३२१४१

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***

**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.